महाराष्ट्र शासन

क्रमांकः- सीसीआर-१११३/प्र.क्र.१३०१/७-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांकः ५ डिसेंबर ,२०१३.

ग (अर्थ)
ने (प्रशासन)
ने (प्रशासन, अर्थ, ना.बँका ,पतसंस्था)

वाचा : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे जा.क्र.अर्थ/वसा/नमसं/बँक खाती /१३/दिनांक ५/०९/२०१३ रोजीचे पत्र

## आदेश

& R
9 DEC 2013

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये नुकतीच सुधारणा करण्यात आली असुन सहकारी संस्थांना त्यांचा निधी मागील ३ वर्षे लेखापरीक्षणाचा "अ" वर्ग असणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अथवा राज्य सहकारी बँकेमध्ये गुंतविण्याची तरतुद सदर अधिनियमातील कलम ७०(अ) मध्ये करण्यात आली आहे. आणि,

ज्याअर्थी, भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. ९.५.२०१२ रोजी राज्यातील वर्धा, बुलढाणा व नागपूर या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे बँकिग परवाना नसल्यामुळे या बँकांना बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ चे कलम ३५-अे अन्वये नवीन ठेवी स्वीकारण्यास प्रतिबंध केला आहे.तसेच मागील तीन वर्षाचा आढावा घेतला असता मुंबई, ठाणे, रायगड, अहमदनगर, पुणे, सातारा व लातूर या सात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना लेखापरीक्षणाचा "अ" वर्ग प्राप्त झाला आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त कारणांमुळे नियोजित सहकारी संस्थांना खाती बँकेत उघडण्यास व नोंदणीकृत सहकारी संस्थांना त्यांचा निधी गुंतवण्यास निर्माण झालेल्या अडचणी विचारात घेऊन जिल्हयामध्ये मुख्यालय असलेल्या व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये मागील सतत तीन वर्षामध्ये "अ" किंवा "ब" वर्ग प्राप्त करणाऱ्या नागरी सहकारी बँकां तसेच संस्थेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या राष्ट्रीयीकृत तथा प्रादेशिक बँकेमध्ये नियोजित सहकारी संस्थांना खाती उघडण्यास व नोंदणीकृत सहकारी संस्थांना निधी गुंतविण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.०५ सप्टेंबर २०१३ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.आणि,

ज्याअर्थी, जिल्हयामध्ये कार्यरत असलेल्या व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये सतत तीन वर्षामध्ये "अ" वर्ग प्राप्त करणाऱ्या नागरी सहकारी बँकां तसेच संस्थेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या राष्ट्रीयीकृत तथा प्रादेशिक बँकेमध्ये नियोजित सहकारी संस्थांना बँक

खाती उघडण्यास व नोंदणीकृत सहकारी संस्थांना निधी गुंतविण्यास मान्यता देणे योग्य ठरेल याबाबत शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७०(ड) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार जिल्हयामध्ये कार्यरत असलेल्या व वैधानिक लेखापरिक्षणामध्ये मागील सतत तीन वर्षामध्ये "अ" वर्ग प्राप्त करणाऱ्या नागरी सहकारी बँकां तसेच संस्थेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या राष्ट्रीयीकृत तथा प्रादेशिक बँकेमध्ये नियोजित सहकारी संस्थांना बँक खाती उघडण्यास व नोंदणीकृत सहकारी संस्थांना निधी गुंतविण्यास मान्यता देण्यात येत आहे.तथापि ज्या नागरी सहकारी बँकेत असा निधी गुंतविला जाणार आहे अशा बँकेकडुन महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ३५ मधील बाहेरील कर्जे उभारणी बाबतच्या तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(राजगोपाल देवरा)
सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३) सचिव (सहकार),यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे.
५) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग नागपुर.
८) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
९) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.

प्रत माहितीस्तव –

१) सर्व सहसचिव,उपसचिव,अवर सचिव,कक्ष अधिकारी सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.